आज घरकुल लाभार्थ्यांना मंजुरी पत्र व दहा लाख लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे वितरण >>पान 2

जिथं कोणतही वाहन जात नाही तिथे एसटी जाते म्हणूनच एसटी तोट्यात : पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांचे मत >>पान 3

समृद्धी महामार्ग दुसर बीड टोल नाक्याजवळ भीषण अपघातात दोघांचा जागीच होरपळून मृत्यू >>पान 4

**सुविचार**

आत्मविश्वासाच्या बळावरच
आपण स्वप्नांना साकार करू शकतो.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई



घरकाम करणाऱ्या बाईनी काढली विकीची नजर आतील पान

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 192 ■ शनिवार, दि. 22 फेब्रुवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# मराठी साहित्य संमेलनाचे थाटात उद्घाटन

## शरद पवारांकडून पंतप्रधान मोदींचे कौतुक

**नवी दिल्ली : मी मराठीतून विचार केला तर मला ज्ञानेश्र्वरांच्या ओळी आठवल्याशिवाय राहत नाही. माझ्या मराठीची बोलू, परि अमृताताशीची पैजा जिंके, या त्यांच्या ज्ञानेश्र्वरांच्या ओळी आहेत. आरएसएसची स्थापना करणारेही मराठीच होते. गोळवलकरांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने एक बीज रोवलं होतं, त्याचा वटवृक्ष झालाय . १०० वर्षापासून संघ चालवत आहे. माझ्यासारख्या अनेकांना आरएसएसने देशासाठी जगायला शिकवलं. संघामुळेच मला मराठी भाषेशी संबंध आलाय, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच उद्घाटन सोहळा पार पडला. यावेळी नरेंद्र मोदी बोलत होते. यावेळी संमेलनाच्या अध्यक्षा तारा भवळकर, ज्येष्ठ नेते शरद पवार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही उपस्थित होते.**



नरेंद्र मोदी म्हणाले, फार छान म्हणत मी भवाळकरांना म्हणालो. त्या म्हणाल्या 'मने गुजराती आवडे छे'...देशाच्या आर्थिक राज्यातून देशाच्या राजधानी आलेल्या सर्व मराठी सारस्वतांना माझा नमस्कार...समर्थ रामदास म्हणाले, 'मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा' जिकडे तिकडे भाषा ही परिपूर्ण भाषण...शूरता आहे, वीरता आहे, समानता आहे. भारताला जेव्हा अध्यात्मिक ऊर्जे ची गरज असते, तेव्हा मराठीतीली महान संतांनी ऋषींच्या भाषेला मराठी भाषेत आणलं.

पुढे बोलताना नरेंद्र मोदी म्हणाले, मराठी साहित्यात देशाच्या स्वातंत्र्याचा इतिहास आहे. ज्ञानबा तुकारामांच्या मराठीला राजधानी अतिशय मनापासून अभिवादन करतो. पवारांमुळे या कार्यक्रमात येण्याची संधी मिळाली. आजतर जागतिक मातृभाषा दिवस आहे. तुम्ही साहित्य संमेलनाचा दिवसही अतिशय चांगला निवडला.

उषा तांबे म्हणाल्या, महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यावर दिल्लीतील पहिलं संमेलन पार पडलं. मराठीला अभिजात दर्जा मिळाल्यानंतरचं संमेलन आहे.

अब दिल्ली दूर नही है, असं म्हणायला लावणारं हे संमेलन आहे.

शरद पवार म्हणाले, साहित्य संमेलन दिल्लीला याचा आनंद आहे. मराठी माणूस झेंडा अटकेपार फडकवणारा आहे. तो दिल्लीत दिसतो, गुजरातमध्ये ही दिसतो. अखिल मराठी साहित्य महाराष्ट्राचे साहित्यिक या सगळ्यांनी एका गोष्टीचा पाठपुरावा केला, तो म्हणजे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला.यासाठी नरेंद्र मोदींबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो. पहिलं दिल्लीतील मराठी साहित्य संमेलन झालं, त्याचं उद्घाटन पंडित नेहरुंनी केलेलं. त्यासाठी काकासाहेब गाडगीळांनी तयारी केलेली. नेहरुंनी त्या साहित्य संमलेनाचं उद्घाटन केलेलं, या साहित्य संमेलनाचं उद्घाटन नरेंद्र मोदींनं केलेलं. मला गुरुस्थानी असलेले यशवंतराव चव्हाण चांगेल साहित्यिक होते. मी ३० वर्षाहून अधिक काळ मराठी अस्मितेसाठी जे जे काही करता येईल, ते केलं म्हणून माझ्यावर स्वागताध्यक्ष म्हणून जबाबदारी आहे. माझ्याकडे खंत व्यक्त केलेली, आतापर्यंत इतकी संमेलने झाले, पण फक्त चारच महिलांना अध्यक्ष होण्याचा मान मिळाला. पण यावेळी एका महिला साहित्यिकाला हा मान मिळाला, याचा आनंद आहे. अखिल भारतीय साहित्य महामंडलाला धन्यवाद देतो.

मराठेशाहीने आपला झेंडा अटेकपार फ़डकवला याचा मराठी साहित्यिकांना सार्थ अभिमान आहे. पाणिपतचा इतिहासही आपल्याकडे आहे. तो आपण काही विसरु शकत नाही.वि.स. खांडेकर, कुसुमाग्रज, विंदा करंदीकर या साहित्यिकांनी देशपातळीवर आपली ओळख निर्माण केली. मराठी भाषेची पताका नारायण सुर्वे..... यांच्यासारख्या कवींनीअण्णाभाऊ साठेंनी गावकुसावरील जगणं मराठी साहित्यात आणलं. संतांनी मराठी साहित्य समृद्ध केले. साहित्य संमेलन जाहीर झाल्यावर महाराष्ट्रात एक चर्चा सुरु होती राजकारण्यांचा इथं काय संबंध? माझं स्वच्छ मत आहे, राजकारण-साहित्यिक यांच्यातील परस्पर पूरक ..कलेला राजाश्रय या वादावर आता पडदा पडावा,असंही पवार यांनी नमूद केलंय.



## मराठी भाषा संतांनी टिकवली, भाषा ही जोडणारी असायला हवी, डॉ. तारा भवाळकरांच्या भाषणाला मोदींसह पवारांची दाद

नवी दिल्ली : मराठी फक्त लिखीतच नाही तर ती बोलीतून पसरली आहे. भाषा हे संस्कृतीचं बलस्थान असते. भाषा ही जोडणारी गोष्ट असायला हवी, तोडणारी नाही असे मत दिल्लीतील ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांनी व्यक्त केलं. एक स्त्री अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची अध्यक्ष झाली हे महत्वाचं नाही तर गुणवत्ता हा विषय महत्वाचा आहे असंही तारा भवाळकर म्हणाल्या. मराठी भाषा संतांनी टिकवली, आमचे संत पुरोगामी होते, फुरोगामी लोकं काहीही म्हणू देत असेही भवाळकर म्हणाल्या. तारा भवाळकरांच्या भाषणाला पंतप्रधान नरेंद्र मोद आणि शरद पवारांनी दाद दिली.

भाषा ही बोलली तर जीवंत राहते, नुसती पुस्तकात आणि ग्रंथात असून उपयोग नाही असेही तारा भवाळकर म्हणाल्या. महाराष्ट्राला पाडुंरंगाचे स्मरण करायला लावणारी ही मराठी भाषा आमच्या संतांनी जीवंत ठेवल्याचे त्या म्हणाल्या. मराठी भषा बोलण्यातून विस्तारली आहे. त्यामुळं छत्रपती शिवाजी महाराजांना खेड्यापाड्यातील मावळे मिळाले असेही तारा भवाळकर म्हणाल्या.

## पालकमंत्री पदाचा तिढा लवकरच सुटेल; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**नागपूर/प्रतिनिधी :** आज विदर्भ दौऱ्यावर आहे. दोन मेळावे आयोजित केले आहे. निवडणूक प्रचारात मी सांगितले होते की, निवडणूक जिंकल्यानंतर मी येईल. त्या अनुषंगाने आजचा दौरा आहे. जिंकल्यानंतर आमची जबाबदारी वाढली आहे. त्याच अनुषंगाने लोकांचे आभार मानायला मी विदर्भात आलो आहे. पालकमंत्री पदाचा तिढाही लवकरच सुटेल, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.



यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धमक्याबाबत बोलताना सांगितले की, यापूर्वीही धमक्या आल्या होत्या. डान्सबार बंद केले. तेव्हाही खूप धमक्या आल्या होत्या. ठार मारण्याच्या धमक्या आल्या, प्रयत्नही झाले. मात्र, मी घाबरलो नाही. नक्षलवाद्यांनी ही धमकी दिली होती. मात्र, मी त्यांच्या धमक्यांना भीक घातली नाही. गडचिरोलीत पहिला औद्योगिक प्रकल्प सुरू करण्याचे काम मी केले. दहावी पेपर फुटीची चौकशी केली जाईल. कॉपीमुक्त महाराष्ट्र करण्याचा आमच्या सरकारचा संकल्प आहे. काही लोक धक्का पुरुष झाले आहे. विधानसभा निवडणुकीत लोकांनी धक्का देऊन बाहेर बसवले आहे. त्यांनी बाळासाहेबांच्या विचारांना धक्का दिला आहे. बाळासाहेबांचे विचार सोडले आहे. पक्षातील चांगल्या लोकांना धक्का मारून पक्ष बाहेर काढणारे जे नेते आहे, जनता त्यांना धक्का दिल्याशिवाय राहणार नाही. म्हणूनच शिवसैनिक आमच्या सोबत येत आहेत, विश्र्वास दाखवत आहेत. शेअर बाजारात ज्या शेअरची पत असते, ते शेअर लोक खरेदी करतात. अशीच आमची शिवसेना आहे. पालकमंत्री संदर्भातला तिढा लवकर सुटेल.मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना बंद होणार नाही. एसटीमध्ये महिलांना ५० टक्के ची सवलत बंद केली जाणार नाही.अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.




# योजनांचा सुकाळ, पाण्याचा दुष्काळ


## डोणगावकर पाण्याच्या अजूनही प्रतीक्षेतच




**दैनिक आपला विदर्भ**

**डोणगाव – डोणगाव ग्रामपंचायत मधील प्रकार आतापर्यंत अनेक योजना अर्धवट डोणगाव जिल्ह्यातील लोकसंख्येच्या तुलनेत सर्वात मोठी ग्रामपंचायत असलेल्या डोणगाव येथे येथील पाणी समस्या निवारण्यासाठी आतापर्यंत अनेक योजनाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात आला. मात्र, एकही योजना पूर्णत्वास न गेल्याने डोणगाव वाशियांच्या घशाची कोरड कायम राहिली आहे. योजनांचा सुकाळ मात्र पाण्याचा दुष्काळ अशी स्थिती डोणगावमध्ये आतापर्यंत राहिली आहे. यावर्षीही तीच परिस्थिती उद्भवण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जल जीवन मिशनचे काम सुरू न झाल्याने उन्हाळ्यामध्ये भीषण पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे.**

डोणगाव ग्रामपंचायत मेहकर मतदारसंघातील महत्त्वाचे लोकसंख्येच्या तुलनेत सर्वात मोठी ग्रामपंचायत आहे. मात्र, डोणगाव येथे वर्षानुवर्षांपासून पाणी समस्यासह इतर समस्या कायम असल्याने नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. सन २०१३-२० १४ या काळात राष्ट्रीय ग्रामीण कार्यक्रम योजनेअंतर्गत कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च करून पाणीपुरवठा करण्याचे काम करण्यात आले होते. मात्र,सदर काम गेल्या अनेक वर्षानंतर अर्धवट स्थितीत आहे. तर, आता पुन्हा जल जीवन मिशन अंतर्गत त्याच कामासाठी तब्बल २० कोटी ९८ लाख रुपयांचा निधी देऊन पाणीपुरवठा करण्याचे नियोजन केले होते.मात्र, सदर काम सुरू होण्यापूर्वीच बारगळल्याने डोणगाव ग्रामस्थांच्या नशिबी पाणीटंचाईची समस्या कायम आहे. तसेच डोणगाव मधील एक भाग असलेल्या कऱ्हाळवाडी कऱ्हाळवाडी येथे २०२३ मध्ये तब्बल ९५ लाख ४३ हजार रुपये खर्च करून जल जीवन मिशन कामास ३१ जानेवारी २०२४ रोजी प्रारंभ करण्यात आला.मात्र, वर्षाच्या वर कालावधी होत असतानाही सदर पाईपलाईन पूर्ण झाली नाही. काम अर्धवट असल्याने कऱ्हाळवाडी येथील नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली आहे. उन्हाळ्याच्या दिवसात पाण्यासाठी जीवाची लाहीलाही होणार असून अधिकारी व ठेकेदार यांनी जनतेची दिशाभूल करून शासकीय निधीवर डल्ला मारण्याचे काम केले आहे, असा आरोप ग्रामस्थ करीत आहेत.याकडे वरिष्ठांनी लक्ष देऊन संबंधित कामाची चौकशी करत तत्काळ काम पूर्ण करावे अशी मागणी कऱ्हाळवाडी येथील नागरिकांकडून होत आहे.





**देविदास खनपटे**
मुख्य संपादक

## ग्रामपंचायतीच्या उपाययोजनाकडे लागले लक्ष

डोणगाव ग्रामपंचायत तालुक्यातील नव्हे तर जिल्ह्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत आहे. त्याचबरोबर राजकीय दृष्ट्या महत्त्वाचे गाव आहे. असे असताना डोणगावमध्ये मात्र, अद्यापही पाणीटंचाईची समस्या निकाली निघाली नाही, कोट्यावधी रुपयाचा दरवर्षी खर्च करण्यात येतो. मात्र, पाणीटंचाई कायम असल्याने प्रशासनाची उदासीनता डोणगाववासीयां च्या पाचवीलाच पुंजलेली असल्याचे दिसून येत आहे.दरवर्षी पाणीटंचाई निर्माण होत असताना यावर कायमस्वरूपी उपाय योजना करण्याची गरज असताना शासकीय योजना ही या ना त्या कारणाने बारगळल्या जात आहेत. परिणामी, डोणगाववासीयांना उन्हाळ्यात भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. यावर्षीही भीषण पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पाणीटंचाईवर ग्रामपंचायत प्रशासन आता काय उपाययोजना करते, याकडे डोणगाव येथील नागरिकांचे लक्ष लागलेले आहे.

## महान स्वातंत्र्य सेनानी राणी चेन्नमा

इंग्रजांनी आपल्या देशावर सुमारे पावणे दोनशे वर्ष राज्य केले. या पावणे दोनशे वर्षांत त्यांनी आपल्यावर अनेक अन्याय अत्याचार केले. इंग्रजांच्या याच अन्याय अत्याचाराच्या विरोधात लाखो ज्ञात अज्ञात देशभक्त बांधवांनी लढा दिला त्यात काही महिलाही होत्या हे मात्र अतिशय कमी लोकांना माहीत आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या महिलांची यादी जर काढली तर अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्या महिलांची नावे आपल्याला आठवतील कारण बऱ्याच महिला स्वातंत्र्य सैनिकांची म्हणा किंवा देशासाठी त्याग करणाऱ्या देशभक्त महिलांची म्हणा आपल्या इतिहासकारांनी नोंदच घेतली नाही त्यामुळे त्यांचा इतिहास नवीन पिढीच्या समोर आलाच नाही. अशाच एका देशभक्त महिला स्वातंत्र्य सेनानीच्या शौर्याची माहिती आज आपण या लेखातून घेऊ कारण आज त्या महान महिला स्वातंत्र्य सेनानीची काल म्हणजे २१ फेब्रुवारी रोजी पुण्यतिथी होती. त्या महान स्वातंत्र्य सेनानीचे नाव आहे कित्तुरची राणी चेनम्मा. २३ ऑक्टोबर १७७८ रोजी बेळगाव येथील काकटी या छोट्या गावात राणी चेन्नमा यांचा जन्म झाला. लहानणापासूनच धाडसी असलेल्या राणी चेन्नमा यांना त्यांचे वडील धुळाप्पा देसाई गौड्रारू यांनी घोडेस्वारी करणे, तलवार चालवणे, भाला फेकणे याचे शिक्षण दिले. वयाच्या पंधराव्या वर्षी राणी चेन्नमा यांचा विवाह देसाई कुटुंबातील राजा मल्लसराज यांच्याशी झाला. मात्र १८२४ हे वर्ष त्यांच्यासाठी दुर्भग्याचे वर्ष ठरले कारण याच वर्षी त्यांच्या पतीचे आणि मुलाचेही निधन झाले. एकाच वर्षी पती आणि मुलगा सोडून गेल्याने त्यांच्यावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला. राजा मल्लसराज यांच्या निधनाने त्यांच्या राज्यात अस्थैर्य माजले याचा लाभ घेण्यासाठी इंग्रजांनी त्यांच्या राज्यावर आक्रमण करण्याचे ठरवले. इंग्रजांकडून राज्य वाचवण्याची फार मोठी जबादारी राणी चेन्नमा यांच्यावर येऊन पडली मात्र त्या डगमगल्या नाहीत. त्यांनी तात्काळ आपली राजधानी डोंगर भागात हलवली. राजगादीला वारस असावा म्हणून त्यांनी शिवलिंगप्पा नावाचा पुत्र दत्तक घेतला व त्याला राज्याचा उत्तराधिकारी बनवले मात्र तत्कालीन ब्रिटिश अधिकारी लॉर्ड डलहौसी याने दत्तक विधान नाकारत शिवलिंगप्पा याची राज्याचा वारसदार म्हणून हाकलपट्टी करण्याचा आदेश दिला. जर एखाद्या राज्याचा राजा निधन पावला आणि त्याला वारस नसेल तर दत्तक असलेला पुत्र राज्याचा वारस होऊ शकत नाही त्यामुळे ते राज्य खालसा करून तिथे ब्रिटिश अंमल सुरू करण्याचा निर्णय इंग्रजांनी घेतला होता त्यामुळे कोणत्याही परीस्थितीत आपले राज्य इंग्रजांच्या ताब्यात जाऊ द्यायचे नाही असा निर्धारच राणी चेन्नमा यांनी केला होता. कित्तुरचे राज्य हे धारवाड जिल्ह्यात येत होते. सेंट जॉन थाक्रेय हा त्यावेळी धारवाडचा गव्हर्नर होता तर चॅप्लिन हा कमिशनर होता. या दोघांनीही राणी चेन्नमा यांना राज्य खालसा करण्याची सूचना केली आणि तसे न केल्यास युद्धास तयार राहण्यास सांगितले. राणी चेन्नमा यांनी शेवटचा पर्याय म्हणून बॉम्बे प्रेसिडेंटचे लेफ्टनंट गव्हर्नर एल्फिन्स्टन यांना राज्य खालसा न करण्याबाबत विनंती अर्ज केला मात्र त्यांनी तो धुडकावून लावत कितुरवर हल्ला चढवला. इंग्रजांनी कित्तुरवर हल्ला चढवला आणि कित्तुरचा खजिना लुटण्याचा प्रयत्न केला. कित्तुरच्या खजिन्यात त्यावेळी मौल्यवान दागदागिने आणि दीड कोट रुपये इतका खजिना होता. इंग्रजांच्या मद्रास नेटीव्ह हॉर्स अर्टे लरीच्या तिसऱ्या तुकडीत २० हजारांपेक्षा अधिक सैनिक होते त्यात सुमारे ४०० पेक्षा अधिक सैनिक हे बंदूकधारी होते मात्र राणी चेन्नमा यांचे सैन्यही कमी नव्हते त्यांनी इंग्रज सैन्या विरुद्ध निकराचा लढा दिला आणि इंग्रज सैन्याचा धुव्वा उडवला. राणी चेन्नमा यांचे सैन्य आपल्याशी अशाप्रकारे धैर्याने मुकाबला करतील अशी अपेक्षा इंग्रजांना नव्हती त्यांनी राणी चेन्नमाच्या सैन्याला हलक्यात घेतले. राणी चेन्नमाचे सैन्याचे बळ इंग्रजांच्या तुलनेत अल्प होते मात्र राणी चेन्नमा यांनी आपल्या सैनिकांमध्ये स्फूर्ती निर्माण केली. आपली राणी महिला असूनही इंग्रजांशी निकराने लढते हे पाहून त्यांनाही स्फुरण चढले आणि त्यांनी इंग्रज सैन्याचा पराभव केला. या युद्धात सेंट जॉन हा गव्हर्नर मारला गेला. इंग्रजांच्या काही अधिकाऱ्यांना राणी चेन्नमा यांच्या सैनिकांनी बंदी बनवले. युद्ध बंदी करण्याच्या अटीवरच या अधिकाऱ्यांची सुटका करण्यात आली. युद्ध बंदीचा करार करूनही इंग्रज अधिकाऱ्यांनी तो पाळला नाही. कमिशनर चॅप्लिन याने मोठ्या ताकदीनिशी कुत्तुरवर पुन्हा हल्ला केला. यावेळीही राणी चेन्नमाच्या सैन्याने निकराने लढा दिला मात्र बैलहोगल किल्ल्यात राणी चेन्नमा पकडल्या गेल्या आणि त्यांना कैदेत टाकण्यात आले. २१ फेब्रुवारी १८२९ रोजी इंग्रजांच्या कैदेतच राणी चेन्नमा यांचे निधन झाले. राणी चेन्नमा यांच्या निधनानंतरही राणीचे सैन्य इंग्रजांशी लढत राहिले मात्र तो लढा अपयशी ठरला. मात्र राणी चेन्नमा यांचे शौर्य पाहून इंग्रज अधिकाऱ्यांनी त्यांना सलाम केला. राणी चेन्नमा यांचे शौर्य इतिहासाच्या पानावरील एक स्फूर्तिदायक अध्याय आहे मात्र आजही हा इतिहास तरुण पिढीपासून दूर आहे म्हणूनच हा लेख प्रपंच. भारतीय इतिहासातील एक सुवर्ण अध्याय म्हणून राणी चेन्नमा यांच्या लढ्याकडे पाहायला हवे. पुण्यतिथीनिमित्त राणी चेन्नमा यांना विनम्र अभिवादन!

# आज घरकुल लाभार्थ्यांना मंजुरी पत्र व दहा लाख लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे वितरण

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** पुणे येथे आयोजीत आवास उत्सव कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण जिल्हा तालुका, ग्रामपंचायत स्तरावर दाखवण्यात येणार असल्याने, सदर कार्यक्रमासाठी जिल्ह्यातील सर्व लाभार्थी, गावातील प्रतिष्ठित व्यक्ती, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सामाजिक कार्यकर्ते, एनजीओ प्रतिनिधी व गावातील सर्व ग्रामस्थांनी सदर कार्यक्रमामध्ये जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, गृहउत्सव साजरा करुन कार्यक्रमाची शोभा वाढवावी. असे आवाहन बुलढाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी केले आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत महाआवास अभियान २०२४-२५ अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा २ मधील राज्यातील २० लाख लाभार्थ्यांना घरकुलाची मंजुरी पत्र व किमान १० लाख लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरण कार्यक्रम २२ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ४.३५ वाजता, मुख्य बॅडमिंटन हॉल, श्री शिव छत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे या ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रम थेट प्रक्षेपण जिल्हास्तरावर, सर्व १३ तालुकास्तरावर तसेच सर्व ८७१ ग्रामपंचायत स्तरावर दाखण्यात येणार आहे.



बुलढाणा जिल्ह्यात, प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा २ अंतर्गत ६३ हजार ८२३ उदिदष्ट प्राप्त झाले असून यापैकी ५५ हजार २८६ (८६.६२%) लाभार्थ्यांना मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. या सर्व ५५ हजार २८६ लाभार्थ्यांना जिल्हा, तालुका व ग्रामपंचायतस्तरावरील कार्यक्रमामध्ये मंजूरी प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार आहे. तसेच मंजुरी दिलेल्या ५५ हजार २८६ लाभार्थ्यांपैकी २८ हजार ७७६ लाभार्थ्यांना गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते वन क्लिकवर पहिला हप्त्याचे वितरण होणार आहे. २२ फेब्रुवारी २०२५ रोजी पुणे येथे आयोजीत आवास उत्सव कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण जिल्हा तालुका, ग्रामपंचायत स्तरावर थेट प्रक्षेपण दाखवण्यात येणार असल्याने, सदर कार्यक्रमासाठी जिल्ह्यातील सर्व लाभार्थी, गावातील प्रतिष्ठित व्यक्ती, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सामाजिक कार्यकर्ते, एनजीओ प्रतिनिधी व गावातील सर्व ग्रामस्थांनी सदर कार्यक्रमामध्ये जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून गृहोत्सव साजरा करुन कार्यक्रमाची शोभा वाढवावी. असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी केले आहे.



## अंगणवाडी सेविकांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन





**दैनिक आपला विदर्भ**

**अमरावती/प्रतिनिधी :** अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना पेन्शन आणि ग्रॅज्युएटी तत्काळ लागू करावी, तसेच प्रधानमंत्री मातृत्व वंदन योजनेचे (झचचतध) काम आरोग्य विभागाकडे वर्ग करावे, या प्रमुख मागण्यांसाठी आज (२१ फेब्रुवारी २०२५) अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि पर्यवेक्षिका कर्मचारी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.

प्रधानमंत्री मातृत्व वंदन योजनेचे काम आरोग्य विभागाकडे द्यावे. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना पेन्शन व ग्रॅज्युएटी तात्काळ लागू करावी, पूर्ण वेळ सेवा असलेल्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शासकीय / निमशासकीय कर्मचाऱ्यांना दर्जा द्यावा, ६५ वर्षे पूर्ण केलेल्या सेवानिवृत्त सेविका व मदतनीस यांना १० लाख रुपयांचे एकरकमी अनुदान द्यावे, 'लाडकी बहिण' योजनेसाठी अंगणवाडी सेविकांकडून सर्वेक्षण करू नये अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.

यावेळी अंगणवाडी सेविकांनी शासनाच्या निर्णयांवर तीव्र नाराजी व्यक्त केली. जर मागण्या त्वरित मान्य झाल्या नाहीत, तर अधिक तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. याप्रसंगी आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत शासनाच्या भूमिकेचा निषेध केला. अंगणवाडी सेविका बालकांच्या पोषण आणि शिक्षणासाठी महत्त्वाचे कार्य करत असतानाही त्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा दिला जात नाही, याबद्दल सेविकांनी संताप व्यक्त केला. या आंदोलनात अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका व विविध संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## घरकाम करणाऱ्या बाईंनी काढली विकीची नजर

**मुंबई/प्रतिनिधी :** विकी कौशलचा 'छावा' सिनेमा गेल्या काही आठवड्यांपासून प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्याची गाथा सांगणारा हा सिनेमा १४ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित झाला आणि पहिल्याच दिवसापासून त्याने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला. दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांनी जवळपास ४ वर्षे मेहनत घेऊन हा सिनेमा बनवला आहे.

'छावा'ने आतापर्यंत जगभरात ३०० कोटींहून अधिक कमाई केली आहे. भारतातच या सिनेमाने २२५.२८ कोटी रुपयांचा गल्ला जमवला आहे. मुंबई-पुण्यात तर सिनेमाचे सर्व शो हाऊसफुल सुरू आहेत. प्रेक्षकांच्या मागणीनुसार आता रात्री १२ नंतर आणि पहाटे ६ वाजताही सिनेमाचे विशेष शो दाखवण्यात येत आहेत.

विकीच्या अभिनयाचे कौतुक

विकी कौशलच्या अभिनयाचे सर्वत्र कौतुक होत आहे. मराठीसह बॉलीवूडमधील अनेक कलाकारांनी विकीच्या अभिनयाचे कौतुक केले आहे. 'छावा'मधील त्याच्या भूमिकेसाठी विकी यावर्षी सर्व पुरस्कारांचा हक्कदार असल्याचे चाहते म्हणत आहेत.

सिनेमाच्या यशानंतर आणि कौतुकाच्या या सोहळ्यानंतर विकीच्या कुटुंबियांनी त्याची नजर काढली आहे. विकीने हा गोड व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला आहे.

# युवा प्रतिष्ठान कोरपणा आयोजित शिवजयंती सोहळ्यात काशी विश्वनाथच्या गंगा आरतीने कोरपणा नगरी दुमदुमली

### कोरपणाकरांनी अनुभवला शिवप्रेमींचा जलवा : जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक विजयराव बावणे प्रमुख उपस्थिती

**दैनिक आपला विदर्भ**

**मनोज गोरे**

**कोरपणा:** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवरायांच्या महतीचा प्रत्यय गुरुवारी कोरपणा शहरात नव्याने आला. ऐतिहासिक कोरपणा रॅलीमध्ये झालेल्या महाआरतीने अवघी कोरपणा नगरी धरारली, शिवरायांच्या पराक्रमाचा जागर करणारे , पारंपरिक वाद्यांचा गजर, फटाक्यांची आतषबाजी, मर्दानी , ढोल ताशा, डमरू वादक,घोडे अशा लवाजम्यासह शिवतीर्थ येथे शिवरायांच्या काशी विश्र्वनाथ वाराणसी येथील गंगा नदीच्या किनारी होणारी सुप्रसिद्ध गंगा आरती उत्साह पहायला मिळाला युवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा कोरपना नगरपंचायत चे नगरसेवक नितीन विजयराव बावणे यांच्याहस्ते महाआरती झाली. हजारो कोरपणाकरांनी हा दैदीप्यमान सोहळा 'याची देही, याची डोळा' पाहिला, हरिद्वार येथील भोले अघोरी स्मशान महाकाल कलाकारांच्या पथकातील कापावंतांनी सारेच भारावले.





१) शिवजयंती मिरवणुकीत सहभागी झालेल्या हरिद्वार येथील भोले अघोरी स्मशान महाकालने लक्ष वेधले. २) उज्जैन येथील सुप्रसिद्ध डमरू वादक आकर्षक दोळ करत साकारले.

**महाआरतीने शिवजयंती सोहळ्याचा समारोप**

भव्य मिरवणुकीत सर्व लहान मुले मुली यांनी छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांची वेशभूषा धारण करून मिरवणुकीची सेवा वाढविली फटाक्यांची पारंपरिक वाद्यांत मिरवणूक काढण्यात आली. बस स्टॅन्ड कोरपना येथे छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना देण्यात आली आंबेडकर चौक कार्यक्रमाच्या स्थळी पोहोचली.रात्री ९ वाजता माननीय श्री गणेश शिंदे यांचे शिवचरित्र या विषयावर प्रेरणादायी व्याख्यान झाले. युवा प्रतिष्ठान ग्रुपने मोठ्या दिमाखात हा सोहळा पार पडला.

या शिवजयंतीचा सोहळा पाहण्याकरिता तालुक्यातील ग्रामीण भागातून अनेक नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.अनेकांनी हा विलोभनीय क्षण आपल्या जयंतीचा मोह आवरता आला नाही

**ऐतिहासिक मिरवणुकीने फेडले कोरपण्याच्या डोळ्यांचे पारणे**

युवा प्रतिष्ठान महोत्सव समिती कोरपणाकडून यंदा शिवमयंतीनिमित शिवसाहित्य गणेश शिंदे यांचे व्याख्याने, महोत्सव, साही मिरवणूक व गंगाआरती, हलगी वादक, अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले गुरुवारी सायंकाळी सहा वाजता ही मिरवणूक निघाली यामध्ये अनेक महिला पुरुष युवक यांनी सहभाग दर्शवून मोठ्या उत्साहात हा कार्यक्रम पार पडला या कार्यक्रमाला काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष उत्तमरावजी पेचे, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक विजयराव बावणे, कोरपणा पंचायत समितीचे माजी सभापती श्याम भाऊ रणदिवे, कोरपणा पंचायत समितीचे माजी सभापती संभाजी कोवे कोरपणा नगरपंचायत च्या नगराध्यक्ष नंदाताई बावणे, बाजार समितीचे सभापती अशोक जी बावणे, विनोद नवले,इस्माईल शेख, भाऊजी पाटील चव्हाण, ज्ञानेश्र्वर आवारी, इरफान भाई, रसूल पटेल व नगरपंचायत चे नगरसेवक आधी प्रमुख पाहुण्यांची उपस्थिती होती कार्यक्रमाचे प्रास्ताविक नितीन बावणे यांनी प्रास्ताविक मध्ये आपले मत व्यक्त करताना युवा प्रतिष्ठानचे संस्थापक तथा कोरपना नगरपंचायतीचे नगरसेवक यांनी आपले विचार व्यक्त करत असताना छत्रपती शिवाजी महाराज हे सर्व धर्म समभावांचे प्रतीक असल्याचे मत व्यक्त केले हा सोहळा दरवर्षी युवा प्रतिष्ठानचे सर्व टीमच्या सहकार्यांनी हा सोहळा दरवर्षी साजरा केला जातो याकरिता कोरपणा शहरातील समस्त नागरिकांचे सहकार्य आम्हाला लागते त्यामुळे या खेळीमेडीच्या वातावरणात सोडा आम्ही साजरा करतो असे मत व्यक्त केले.संचालन प्रफुल मालेकर यांनी केले

अशा प्रकारचा भव्य दिव्य शिवजयंती पहिल्यांदाच अशा प्रकारचे कौतुकास्पद नियोजन आणि आयोजन युवा प्रतिष्ठानच्या संस्थापक नितीन बावणे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेला या शिवजयंती उत्सवात सहभागी अनेकांनी सहभाग घेतला असे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# जिथं कोणतही वाहन जात नाही तिथे एसटी जाते म्हणूनच एसटी तोट्यात : पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांचे मत

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** दोन महिने झाले पर्यटन विभाग माझ्याकडे आला आहे. जुने पर्यटनाचे प्रकल्प हातात घेतले आहेत, ते प्राधान्याने पूर्ण करण्याचं ठरवलं आहे. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी जिथे संधी आहे, तिथं प्रकल्प हाती घेण्याचे सांगितले आहे. जिथे कोणतेही वाहन जात नाही तिथे एसटी जाते म्हणून एसटी तोट्यात आहे, असे मत पर्यटन मंत्री शंभूराजे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. यावेळी ते पुढे म्हणाले की, रायगडच्या पायथ्याशी पाचाड या ठिकाणी शिवसृष्टी साकारण्याचं काम पहिल्या टप्प्यात हाती घेतले आहे.

प्रतापगडाच्या पायथ्याशी ज्या ठिकाणी छत्रपती शिवरायांनी अफजलखानाचा वध केला, ते ठिकाणही विकसित करणार आहे. ऐतिहासिक पन्हाळा आणि दख्खनचा राजा जोतिबा ठिकाण विकसित करण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर, मंत्री हसन मुस्लिम यांच्याशी चर्चा करून प्राधान्याने प्रयत्न करणार आहे. काल दिल्लीच्या मुख्यमंत्री शपथविधी सोहळ्याला मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री गेले होते. दिल्लीतून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भूमिका स्पष्ट केली आहे.

मागच्या सरकारमध्ये जे निर्णय व्हायचे ते दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना विश्र्वासात घेऊन विचारविनिमय करूनच निर्णय व्हायचे. स्काय वॉक, पोस्टल रोड संदर्भात माहिती घेतल्याशिवाय आणि मुख्यमंत्र्यांशी चर्चा केल्याशिवाय बोलणं योग्य नाही. रोज रोज धक्के बसत असतील तर त्याचं कारण शोधलं पाहिजे,उद्धव ठाकरे यांनी भुकंपाचा केंद्रबिंदू शोधला पाहिजे. कोणत्या मूळ ठिकाणापासून हे भूकंप होत आहेत ते त्यांनी शोधावं आम्ही २०१९ पासून त्यांना हेच सांगतोय. त्यांनी ऐकलं नाही आणि त्याचे हे परिणाम असतील ओके साहेब आता स्वतःच म्हणत आहेत धक्के बसत आहे. भूकंपाचा केंद्रबिंदू शोधला की, त्याच्यावरचा उपाय करता येईल, ज्यांना धक्का बसतोय त्यांनी अंडर करंट शोधला पाहिजे, शोधा म्हणजे सापडेल. इनकमिंगबद्दल आम्ही आधीच सांगत नाही, मी आणि उदय सामंत एकदाच बोललो. जितेंद्र जनावळे सारखे विभाग प्रमुख मातोश्री गेले. उद्धव ठाकरेंना भेटले मात्र, ते उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या शिवसेनेत आले. शिवसेनेत ही मोठ्या प्रमाणात प्रवेश सुरू आहे. एसटी महामंडळ आधीपासूनच तोट्यात आहे, जिथं कोणतही वाहन जात नाही तिथे एसटी जाते म्हणूनच एसटी तोट्यात आहे. महिलांना ५० टक्के सवलत दिल्यामुळे एसटी महामंडळाचा तोटा वाढला. महामंडळ तोट्यात आहे, म्हणून योजना बंद झाली का. महायुतीला प्रचंड बहुमत मिळवून देण्यासाठी अनेक आहेत. त्यामधला प्रमुख घटक लाडक्या बहिणी आहेत, साधू संत महात्मे प्रवचनकार, कीर्तनकार, यांचा समावेश आहे. वैभव नाईक माझे मित्र आहे, एका बाजूला त्यांचेच नेते म्हणत आहेत. मला थक्के बसत आहेत. ते कशामुळे बसतात त्याची माहिती त्यांच्या नेत्यांकडून घेतली जर त्यांना जाता येत असेल तर तर त्यांना हा प्रश्र्न कधीच पडणार नाही. विरोधकांचं कामचं आहे, राजीनामा मागणं, २४० आमदार एका बाजूला आणि ४० आमदार एका बाजूला विधानसभेत आहेत. काही ना काही गोष्टी काढून सत्ताधाऱ्यांवर टीका करायची, आमच्या कोणत्याही मंत्र्यांवर आरोप झाले तर मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री शिंदे, पवार यांच्याकडून चौकशी होईल. त्यातून दुध का दूध पाणी का पाणी होणार आहे, चौकशी झाल्यानंतर वरिष्ठ या बाबतीत निर्णय घेतील. हा विभाग माझ्याकडे आल्यापासून माजी सैनिक विभागाकडे किती रिक्त पद आहेत. त्याची माहिती मागवली आहे. ही माहिती आल्यानंतर कोणत्याही विभागात भरती निघेल, त्यात माजी सैनिकांचा कोटा अनिवार्य पद्धतीने भरला पाहिजे, अशी माझी हा विभागाचा प्रमुख म्हणून भूमिका आहे. असे मत पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी व्यक्त केले.



## संक्षिप्त...

### पनवेल महापालिकेकडून महिलांसाठी मोफत वाहन चालविण्याचे प्रशिक्षण, राज्यात पहिल्या महानगरपालिकेतून महिलांसाठी उपक्रम



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** पनवेल महापालिकेने महिलांच्या सक्षमीकरणासाठी गुलाबी अर्थसंकल्पांतर्गत चारचाकी वाहन चालविण्याचे मोफत प्रशिक्षण देण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. यासाठी महापालिका प्रशिक्षण संस्था नियुक्त करण्याच्या प्रक्रियेत आहे. प्रशिक्षणानंतर महिलांना शिकाऊ परवाना मिळणार असून, सुमारे १ लाख महिलांना याचा लाभ होण्याची शक्यता आहे. पनवेलसह खारघर, कामोठे, कळंबोली, तळोजा, नवीन पनवेल आणि खांदेश्र्वर येथील महिलांसाठी ही योजना असेल. तत्कालीन आयुक्त गणेश देशमुख यांनी महिला सक्षमीकरणासाठी २५ लाखांची तरतूद केली होती. विद्यमान आयुक्त मंगेश चितळे यांनी निविदा जाहीर करत प्रशिक्षण संस्थांकडून प्रस्ताव मागविले आहेत.

प्रशिक्षण संस्था प्रादेशिक परिवहन विभागाकडे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. प्रक्रिया पूर्ण झाल्यावर महिलांकडून अर्ज मागवले जातील आणि प्रशिक्षण सुरू होईल. महिलांनी मोठ्या संख्येने या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त कैलास गावडे यांनी केले आहे.

### चोरी आणि हरवलेले मोबाईल मिळवून कोपर खैरणे पोलिसांनी केले परत





दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** कोपर खैरणे हद्दीत नागरिकांचे चोरी गेलेले आणि हरवलेले मोबाईल खोपर खैरणे पोलिसांनी शोधून पुन्हा मोबाईल मालकांना परत केले. पोलिसांमार्फत शे आया या पोर्टल मार्फत पोलिसांनी चोरी आणि हरवलेल्या मोबाईलचा शोध घेत ते शोधून काढले आणि पुन्हा त्याच मालकांना परत केले. ७ लाख रुपये किमतीचे वेगवेगळ्या कंपनीचे जवळपास २७ मोबाईल पोलिसांनी परत केले. यावेळी मूळ मालकांनी आनंद व्यक्त करत पोलिसांचे आभार मानले.

### शेतकरी हाच राजा आहे असं माझं मत आहे माणिकराव कोकाटे

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** मी शेतकऱ्यांचा कुठलाही अवमान केलेला नाही आणि करू देखील शकत नाही. माझ्या वाक्याचा माध्यमांनी विपर्यास केला. उलट शेतकरी हाच राजा आहे. या सगळ्या प्रकरणावर विरोधक राजकारण करत आहेत. असे मत कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. यावेळी कृषिमंत्री कोकाटे म्हणाले की, न्यायालयाने दिलेल्या निर्णया विरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार आहे. दोन दिवसात याबाबत न्यायालयात धाव घेणार आहे.राजीनामा मागने एवढंच काम आता विरोधकांचं राहिलय.घर घेतल्यानंतर पाच वर्षांनी माझं दोन हजार रुपयांनीच उत्पन्न वाढलं आहे. काही गोष्टी रेकॉर्डवर न आल्यामुळे गैरसमजामुळे काही गोष्टी घडल्या. जो काही निर्णय होईल तो आपल्या सगळ्यांच्या समोर येईल, मी शेतकऱ्यांचा कुठलाही अवमान केलेला नाही आणि करू देखील शकत नाही.माझ्या वाक्याचा माध्यमांनी विपर्यास केला. उलट शेतकरी हाच राजा आहे असं माझं मत आहे या सगळ्या प्रकरणावर ज्यांना राजकारण करायचं आहे, ते राजकारण करत आहेत. असे मत कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी व्यक्त केले.



### शिवजयंतीमध्ये बिष्णोईचे पोस्टर झळकविणारा पोलिसांच्या ताब्यात

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** छत्रपती संभाजीनगर शहरात शिवजयंतीच्या मिरवणुकीत एका तरुणाने थेट कुख्यात गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचे पोस्टर झळकवल्याने शहरात खळबळ उडाली होती.या घटनेचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर पोलिस यंत्रणा खडबडून जागी झाली.पोलिस उपायुक्त नितीन बगाटे यांच्या निर्देशानंतर गुरुवारी रात्री पोस्टर झळकविणाऱ्या तरुणाला क्रांती चौक पोलिसांच्या विशेष पथकाने ताब्यात घेतले. दर्शन ऊर्फ विशाल शाम पवार असेया रुणाचे नाव असल्याची माहिती पोलीस उपायुक्त नितीन बगाटे यांनी दिली.

शहरात बुधवारी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरी करण्यात आली होती मात्र या जयंतीच्या जल्ल ोषात क्रांती चौकात काही तरुणाच्या टोळक्याने थेट कुख्यात गैंगस्टर लॉरेन्स बिष्णोईचे पोस्टर झळकविले.त्यावर गांधी द्वेष असलेली वाक्य लिहिलेली होती. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पोस्टरच्या बाजूला बोष्णोईचे पोस्टर झळकल्याने शिवभक्तांसह सर्वस्तरातून संताप व्यक्त होत होता.

### आजपासून दहावीच्या परीक्षेला सुरुवात



दैनिक आपला विदर्भ

■ अबुतालीब खान

**सुलतानपूर :** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री शिवाजी हायस्कूल सुलतानपूर या ठिकाणी २१ फेब्रुवारी२०२५ रोज शुक्रवारपासून वर्ग दहावीच्या परीक्षेला सुरुवात झालेली आहे.... सविस्तर वृत्त असे की दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शासनाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या वर्ग दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेला २१ फेब्रुवारी २०२५ रोज शुक्रवारपासून शासनाच्या आदेशानुसार सुरुवात झालेली आहे.

वर्ग एक ते दहा पर्यंत विद्यार्थ्यांसाठी वर्ग दहावीची बोर्डाची मुख्य परीक्षा घेतली जाते. ही परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांची खरी शालेय परीक्षा असते. श्री शिवाजी हायस्कूल सुलतानपूर हे दरवर्षी या परीक्षेसाठी केंद्र म्हणून नेमले जाते. या परीक्षेसाठी या हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री सुनील व्ही.सोळंके सर यांची केंद्र संचालक म्हणून नेमणूक झालेली आहे.

त्यांच्या अधिपत्याखाली सुनियोजित आणि शिस्तबद्ध पद्धतीने शांततेच्या आणि सुव्यवस्थेच्या वातावरणात या परीक्षेला कॉफी मुक्त सुरुवात झालेली दिसून आली. या ठिकाणी १) श्री शिवाजी हायस्कूल सुलतानपूर २) श्री सिद्धेश्र्वर विद्यालय सुलतानपूर ३) नॅशनल उर्दू हायस्कूल सुलतानपूर ४) सहकार विद्या मंदिर सुलतानपूर या शाळेचे वर्ग दहावीचे विद्यार्थी परीक्षार्थी म्हणून आपली परीक्षा देत आहेत. आज रोजी तीन शाळेचे २८८ विद्यार्थी परीक्षा देत आहेत. आणि २४ फेब्रुवारीपासून सहकार विद्या मंदिर सुलतानपूरचे विद्यार्थी या परीक्षेमध्ये सहभागी होणार आहेत. म्हणजेच एकूण ३२६ विद्यार्थी परीक्षार्थी म्हणून आपली परीक्षा देणार आहेत. श्री सुनील व्ही. सोळंके सर केंद्र संचालक यांच्या सुनियोजित देखरेखी मध्ये या परीक्षेला चांगली सुरुवात झालेली आहे.

या ठिकाणी सुरज साठे विद्यार्थी संघटना जिल्हाध्यक्ष राका शरद पवार गट यांनी या परीक्षा केंद्रावर येऊन शिक्षक आणि विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या .चांगला पोलीस बंदोबस्त म्हणून कॉन्स्टेबल सुनील नागरे होमगार्ड शिवाजी देशमुख हे या ठिकाणी आपली सुरक्षा देत आहेत.

### शिरपूर (जैन) परिसरात हळद काढणीला सुरुवात



दैनिक आपला विदर्भ

■ उमेश बोराटे

**शिरपूर जैन :** परिसरात हळद काढणीला आणि वेचनिला सुरुवात झाली आहे हळद हे पीक प्रामुख्याने या परिसरात घेतले जाते वाशीम या जिल्ह्यात एकट्या शिरपूर जैन शिवारात अंदाजे तीन ते चार हजार एकरांपर्यंत हळदीची लागवड होत असते. सध्या हळदीचे पीक परिपक्व झालेले असून, हळद काढणी व वेचणीला वेग आला आहे. काही शेतकऱ्यांनी हळदीची काढणी केल्यानंतर लगेच उकळण्याचे कामही हातात घेतले आहे. हळद हे मसाला वर्गीय पीक शेतकऱ्यांसाठी नगदी पीक म्हणून मानले जाते. हळदीचा पेरा प्रामुख्याने मालेगाव, रिसोड तालुक्यात अधिक होत असतो. त्यातही शिरपूर व परिसर हळदीचे हब म्हणून समोर येत आहे. पाण्याच्या उपलब्धतेनुसार शेतकरी हळदीची लागवड करीत असतात. हळद तयार करण्याची प्रक्रिया क्लिष्ट स्वरूपाची राहते. जूनमध्ये पेरणी झाल्यानंतर हळदीची फेब्रुवारीपासून काढणी सुरू होऊन मार्च ते एप्रिलच्या पहिल्या आठवड्यापर्यंत हंगाम चालतो. हळद काढणीसाठी यंत्राचा वापर होऊ लागला. ट्रॅक्टरच्या मदतीने हळद उकरली जाते. त्यानंतर मजुरांच्या माध्यमाने कंदाची वेचणी करण्यात येते. हळदीची वेचणी केल्यानंतर शेतकरी पुढील हंगामात लागवडीसाठी कंद बाजूला काढून ठेवतात. राहिलेली हळद कढईच्या माध्यमातून किंवा वाफेच्या साह्याने उकळली जाते. उकळलेली हळद काही दिवस वाळवली जाते. पॉलिश केल्यानंतर हळद विक्रीसाठी तयार होते. या प्रक्रियेला जवळपास एक महिन्याचा कालावधी लागतो या कालावधीत शेतकऱ्यांना अनेक अस्मानी संकटाना सामोरे जावे लागते

### मेहकर तहसील येथे फार्मर आयडी रजिस्ट्रेशन तसेच जनजागृती पंधरवडा समारोप

**फार्मर आयडीने शेतकऱ्यांमध्ये एकसूत्रता आणली : आमदार सिद्धार्थ खरात**







दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** आपल्याकडे आधार कार्ड, रेशन कार्ड,वाहन परवाना डिजिटल करण्यात आले. मात्र शेतकऱ्यांचा सातबारा,मालकी हक्क यामध्ये एकसुत्रता नव्हती. फार्मर आयडीमुळे शेतकऱ्यांमध्ये एकसूत्रता आली. मेहकर तालुक्यात २७ हजार तर लोणार मध्ये १९ हजार शेतकऱ्यांचे फार्मर आयडी तयार झाले आहे. उर्वरित शेतकऱ्यांनी सुद्धा लवकरात लवकर नोंदणी करावी, असे आवाहन आमदार सिद्धार्थ खरात यांनी केले.

अँग्रीस्टॅकच्या अंतर्गत फार्मर आयडी रजिस्ट्रेशन तसेच जनजागृती पंधरवडा या कार्यक्रमाचा समारोप २१ फेब्रुवारी शुक्रवार रोजी मेहकर तहसील येथे झाला. यावेळी आमदार सिद्धार्थ खरात बोलत होते. पुढे ते म्हणाले की, फार्मर आयडीमुळे शेतकऱ्यांना केंद्र व राज्य सरकारच्या अनेक योजनांचा लाभ घेता येणार आहे. पीक विमा, पीक कर्ज, पीएम किसान व विविध पीक अनुदान यांचा लाभ मिळवताना शेतकऱ्यांना आता कसरत करावी लागणार नाही. मेहकर व लोणार तालुक्यात पंधरा दिवसात प्रशासनाने ४६ हजाराची नोंदणी करणे हे कौतुकास्पद आहे. त्यांनी उर्वरित शेतकऱ्यांची नोंदणीही लवकर पूर्ण करावी. तसेच मेहकर व लोणार तालुक्यातील घरकुल योजनांमधील अडचणी सोडवण्याचे निर्देशही आ.सिद्धार्थ खरात यांनी उपविभागीय अधिकारी यांना दिले.

याप्रसंगी माजी आमदार संजय रायमुलकर, उपविभागीय अधिकारी जोगी, तहसीलदार निलेश मडके, जयचंद वठिया, माजी नागर सेवक शैलेश बावस्कर, गटविकास अधिकारी देशमुख, काळे, मेटांगळे, लगड मॅडम यांची उपस्थिती होती.

राजकारणात आमची हेल्दी स्पर्धा माजी आमदार संजय रायमुलकर आणि मी राजकारणात वेगवेगळ्या पक्षात आहे. राजकारणात आमची हेल्दी स्पर्धा असल्याचे आमदार सिद्धार्थ खरात यावेळी म्हणाले. आमच्या स्पर्धेत प्रशासनाने जास्तीत जास्त जनतेचे कल्याण करावे, विकास कामात राजकारण आणणार नाही, असेही ते म्हणाले.

# समृद्धी महामार्ग दुसर बीड टोल नाक्याजवळ भीषण अपघातात दोघांचा जागीच होरपळून मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**लोणार :** दिनांक २०/२/२०२५ रोजी सकाळी ९ वा दरम्यान बुलढाणा जिल्ह्यातील दुसरबीड जवळील टोलनाक्यापासून ५०० मीटर अंतरावर हुंडाई आय टेन कार क्रमांक- एम एच -०४ एल बी- ३१०९ च्या भीषण अपघातात दोन जणांचा जागीच होरपळून मृत्यू झाला.

सविस्तर वृत्त असे की, समृद्धी महामार्गाने सदर कार मुंबईतहुन अकोल्याच्या दिशेने जात असताना चॅनेज क्रमांक ३१८.८ जवळ नागपूर कॅरिडोरवर चालक नामे अभिजीत अर्जुन चव्हाण वय ३५ वर्ष मुंबई यांचे कार वरील नियंत्रण सुटल्याने




कार मिडीयम मधील क्रॅश बॅरिअरला धडकून सदर बॅरियरची पट्टी कारच्या समोरील भागातून घुसून आरपार पाठीमागून निघाली. व कार ने तात्काळ पेठ घेतला. यामध्ये अकोला येथे बहिणीच्या घरी जात असलेले १) गणेश सुभाष टेकाळे वय ४० वर्ष व २) राजू महंतलाल जयस्वाल वय ३२ वर्ष दोन्ही रा मुंबई यांचा जागेवरच होरपळून मृत्यू झाला. व चालक अभिजीत अर्जुन चव्हाण वय ३५ वर्ष हा गंभीर जखमी झाल्याने तात्काळ महामार्ग ॲम्बुलन्सचे डॉक्टर वैभव बोराडे, डॉक्टर यासीन शहा,चालक दिगंबर शिंदे यांनी तात्काळ सदर जखमीला बीबी ग्रामीण रुग्णालय येथे उपचार कामी घेऊन गेले व दोन्ही मृत पावलेले व्यक्ती यांना ग्रामीण रुग्णालय सिंदखेडराजा येथे ठेवण्यात आले असून. सदर मृतक यांचे नातेवाईक यांच्या यांच्याशी संपर्क साधून पुढील कारवाई करण्यात येत आहे. अपघात घडला त्यावेळी तात्काळ समृद्धी महामार्ग QRV टीम व महामार्ग पोलीस चे पीएसआय गजानन उज्जैनकर, शैलेश पवार, पोहेकॉ विठ्ठल काळुसे, मुकेश जाधव, संतोष वनवे, संदीप किरके, अरुण भुतेकर व एम एस एफ स्टॉप यांनी तात्काळ घटनास्थळ गाठून सदर मृतदेह जळालेल्या कारमधून बाहेर काढले. व सदर ठिकाणी तात्काळ किनगाव राजा पोलीस स्टेशनचे ठाणेदार नरवाडे व देऊळगाव राजा उपविभागाचे DYSP मनीषा कदम मॅडम यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पुढील कारवाई करीत आहे. व अपघातग्रस्त कार क्रेनच्या साह्याने मिडीयम मध्ये लावून वाहतूक सुरळीत करण्यात आली.

## विविध वृत्त...

## दहावीच्या ४० हजार १९४ विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा; जिल्ह्यात कुठेही अनुचित प्रकार घडला नाही, शिक्षणाधिकारी अनिल आकाळ यांची माहिती




दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** इयत्ता दहावीच्या परीक्षेला आज पासून सुरुवात झाली आहे. जिल्ह्यातील १५९ परीक्षा केंद्रांवर ४० हजार १९४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली आहे. हुशार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी कॉपीमुक्त अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाची प्रभावी अंमलबजावणीसाठी २४ भरारी पथक स्थापन करण्यात आले आहे. तर इयत्ता दहावीच्या परीक्षेसाठी १५९ परीक्षा केंद्रांवर १५९ बैठे पथके नियुक्त करण्यात आली आहेत. परीक्षेच्या सुरळीत आयोजनासाठी जिल्हा स्तरावर सहा भरारी पथके, १३ तहसीलदार पथके आणि ५ उपविभागीय अधिकारी पथके कार्यरत आहेत. आज एकही कॉपी प्रकरण आढळलेले नाही. परीक्षा केंद्र परिसरात गैरप्रकार रोखण्यासाठी कॉपीमुक्त अभियानाची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे.

## कामगार मंत्री ना.ॲड आकाश फुंडकर यांचा जिल्हा दौरा



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** राज्याचे कामगार मंत्री ना.ॲड आकाश फुंडकर हे शनिवार दि. २२ फेब्रुवारी रोजी जिल्हा दौऱ्यावर येणार आहेत.

त्यांच्या दौऱ्यानुसार दुपारी १२ वाजता जलंब येथे पोलीस अधीक्षक, बुलढाणा अंतर्गत येत असलेल्या पोलीस स्टेशन जलंब आणि पिंपळगाव राजा प्रशासकीय इमारत बांधकामाच्या भूमिपूजन समारंभास उपस्थिती, त्यानंतर नियोजित कार्यक्रमानुसार अकोलाकडे रवाना होतील.

## रमजान महिन्यापूर्वी स्वच्छता मोहीम आणि सुरळीत पाणीपुरवठा करा; मुस्लिम बांधवांचे नगर परिषद कार्यालयासमोर धरणे आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** पवित्र रमजान महिना सुरू होण्यापूर्वी शहरातील मुस्लिमबहुल भागात सुरळीत पाणीपुरवठा व स्वच्छता मोहीम राबविण्यात यावी, या मागणीसाठी आज ओपन मुस्लिम कोअर कमिटीच्या वतीने नगर परिषद कार्यालयासमोर धरणे आंदोलन करून करण्यात आले. येत्या २ मार्चपासून रमजानचा पवित्र महिना सुरू होत आहे. मुस्लिम समाजात पवित्र रमजान महिन्याला खूप महत्त्व आहे. परंतु दुर्दैवाने शहरातील इकबाल नगर, जोहर नगर, कमेला परिसर, मिर्झा नगर, झोपापट्टी परिसर, इंदिरा नगर, जुनागांव, टिपू सुलतान चौक परिसर आदी मुस्लिमबहुल भागात सध्या स्वच्छतेचा आभाव आहे. दररोज स्वच्छतेअभावी सर्वत्र कचरा व घाण पसरलेली आहे. तसेच सुरळीत पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. या समस्यांबाबत ओपन मुस्लिम कोअर कमिटीच्यावतीन नगर परिषद कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले आहे.

## धक्कादायक ! ४२ वर्षीय सासऱ्यासह मित्राचा २० वर्षीय सुनेवर बलात्कार

**ठाणे/प्रतिनिधी :** सासरा सुनेच्या नात्याला काळीमा फासणारी धक्कादायक घटना भिवंडी शहरात घडली आहे. २० वर्षीय पीडित सुनेला तिच्या वडिलांकडे सोडण्याच्या बहाण्याने सासऱ्यासह त्याच्या मित्रानं पीडितेला भिवंडीतील एका खोलीत कोंडून ठेवले. त्यानंतर पीडितेच्या आई वडिलांसह भावाला ठार मारण्याची धमकी देत बलात्कार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनंतर महिला आमदाराला धमकीच पत्र

### आ. श्वेता महाले यांना जीवे मारण्याची धमकी



चिखलीच्या भाजपा आमदार श्वेता महाले यांना पोस्टाद्वारे धमकीचे पत्र आले होते. या प्रकरणी आज चिखली तालुक्यातील भाजपा कार्यकर्ते आक्रमक झाले असून, शेकडो भाजपा कार्यकर्ते चिखली पोलीस स्टेशन मध्ये दाखल झाले. आरोपीला तात्काळ पकडून कारवाई करण्याची मागणी केली आहे.
**-संग्राम पाटील, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन चिखली.**

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना धमकी प्रकरण ताजे असतानाच आता बुलढाणा जिल्ह्यातील चिखली विधानसभा मतदारसंघाच्या भाजपच्या आमदार श्वेता महाले यांना धमकीच पत्र मिळाले आहे. तुला जिवे मारून टाकू, तुझे तुकडे तुकडे करू, इंदिरा गांधी यांना सुद्धा सुरक्षा होती, असा उल्लेख या पत्रात नमूद असल्याचं खुद्द श्वेता महालेंनी सांगितले. यामुळे खळबळ उडाली असून, आमदार महाले दुपारी आपल्या कार्यकर्त्यांह पोलिसांत जाऊन तक्रार दिली आहे. श्वेता महाले यांना धमकीचे पत्र प्रकरणी शेकडो भाजपा कार्यकर्ते पोलीस स्टेशनमध्ये दाखल, आरोपीवर कारवाईची केली मागणी आहे.

## धमक्या देणाऱ्यांनी समोर यावे त्याची व्यवस्था आम्ही करू

### आमदार संजय गायकवाड यांचा पत्रकार परिषदेत इशारा

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिल्या जात असलेल्या धमक्या ह्या पोकळधमक्या आहेत. पोलिसांनी मला सांगितले असते तर, मीच त्यांची व्यवस्था केली असती. पोलिसांची गरजही पडली नसती. राज्यासाठी चांगलं काम करणाऱ्या मंत्र्यांना जर, अशी धमकी येत असेल, तर आमच्यासारखे कार्यकर्ते हे कट उधळून लावतील, धमक्या देणाऱ्यांनी समोर यावे, असा इशारा आमदार संजय गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिला.

यावेळी आमदार संजय गायकवाड म्हणाले की, मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी मंजूर केलेल्या प्रकल्पाची फडवणीस यांनी चौकशी लावली तो प्रशासनाचा भाग आहे. परंतु, मुख्यमंत्र्यांनी केली म्हणून



त्याची चौकशी होत असेल असं मला वाटत नाही. किरीट सोमय्या समोर आले तरी त्याचा काही परिणाम होणार नाही. परंतु, असं काही होणार नाही, असा विश्वास आमदार गायकवाड यांनी व्यक्त केला.

इतिहासाला काल्पनिक म्हणणाऱ्या स्वरा भास्कर हिला लाज वाटली पाहिजे. मुघल, पोर्तुगीज यांच्या गुलामगिरीचा सामना करत हजारो महिलांची इज्जत लुटली जात होती. हिंदूंच्या कत्तली केल्या जात होत्या, त्यावेळी दोन छत्रपतींनी या सर्वांनासोबत घेऊन स्वराज्य निर्माण केले. परंतु, इतिहास माहीत नसलेल्या स्वरा भास्कर हिला लाज वाटली पाहिजे. इतर महिलांनी इतिहासावर अपशब्द बोलणाऱ्या महिलेचे थोबाड फोडले पाहिजे. विविध आमदारांना धमक्यांचे पत्र आणि फोन येत आहेत. राज्यातील विविध आमदारांना धमक्याच्या फोन, पत्र येत आहेत. धमक्या देणाऱ्यांना आईने दूध पाजले असेल तर त्यांनी समोर यावे, असा इशारा आमदार संजय गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिला.

## रमाई घरकुल योजनेचा दुसरा हप्ता द्या अन्यथा ठिय्या आंदोलन उ.बा.ठा. शिवसेनेचा इशारा

दैनिक आपला विदर्भ

**लोणार/प्रतिनिधी :** रमाई घरकुल योजनेचा दुसरा हप्ता त्वरित घ्यावा, अन्यथा नगर परिषदेमध्ये ठिय्या आंदोलन करू असा इशारा शिवसेना उ.बा.ठा. च्या वतीने मुख्याधिकारी नगरपरिषद लोणार यांना देण्यात आला

लोणार येथील रमाई घरकुल योजनेअंतर्गत मुख्याधिकारी यांनी विधान सभा निवडणुकीच्या अगोदर घाई घाईने पन्नास हजार रुपयांचा पहिला हप्ता घरकुलधारकांना दिला. त्यानंतर लाभार्थ्यांनी आपले घर पाडले व नव्याने बांधकाम करण्यास सुरुवात केली. या घटनेस पाच महिने उलटून गेले तरी अद्याप पुढील हप्ता त्यांना मिळालेला नाही. नगरपरिषदेने पहिला हप्ता विधानसभा निवडणुकी अगोदर गडबडीत का होत नाही पण दिला आणि तो दिला म्हणजे प्रशासनाने सर्व कागदपत्रांची पूर्तता, नियम अटी घरांचे सर्वे करूनच व संपूर्ण अभ्यासुनच दिलेले आहे. मग दुसरा हप्ता देण्यास काय हरकत आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.सदरील लाभार्थी यांच्या डोक्यावरचे छत हिरावलेले आहे. त्यांचे संसार उघड्यावर आले आहे. करिता आपण त्यांचा पुढील हप्ता येत्या पंधरा दिवसाच्या आत देण्यात यावा, नसता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तसेच लाभार्थी यांच्यासह नगरपरिषद कार्यालयावर ठिय्या आंदोलन करण्यात येईल,



असा इशारा शिवसेना उबाठाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछीरे, तालुकाप्रमुख अड. दीपक मापारी, शहर प्रमुख गजानन जाधव, महिला तालुका प्रमुख तारामती जायभाये, शहर संघटक कैलास अंभोरे, शहर उपप्रमुख लुकमान कुरेशी, विभागप्रमुख गोपाल मापारी, सुदन अंभोरे, तानाजी अंभोरे, युवा सेना शहर प्रमुख श्रीकांत मादनकर, विनायक मापारी, अमोल सुटे, फहीम खान, ज्ञानेश्र्वर दूधमोगरे, सचिन सरदार, गुलाब सोनवणे आदींनी दिला आहे.

## खळेगाव,कोनाटी शिवारातील धरण आटल्यामुळे सोळा गावांना करावा लागणार भीषण पाणीटंचाईचा सामना

### ■ शासनाच्या हलगर्जीपणामुळे सोळा गावांना सोसावे लागणार पाणीटंचाईचे चटके

दैनिक आपला विदर्भ

■ अशोक मुंढे

**महारचिकना :** २०२४ साली झालेल्या सरासरीपेक्षा खुप कमी पावसामुळे लोणार तालुका व सिंदखेडराजा या दोन तालुक्याच्या सीमेवर असलेल्या कोणाटी व खळेगाव या दोन गावाच्या मधोमध असलेले धरण कोरडे पडले आहे मागील वर्षी पाऊस सरासरीपेक्षा कमी पडल्यामुळे ३०ते४० टक्के धरण भरले होते त्यामुळे धरणातील पाणी परीसरातील गावांना पिण्यासाठी




राखीव ठेवायला पाहीजे होते परंतु धरणातील पाणी परीसरातील गावांनी शेतीसाठी उपसले याकडे पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी जाणुनबुजून दुर्लक्ष केले त्यामुळे धरणातील पाणी पुर्ण संपले आहे

त्यामुळे या धरणाहुन कोट्यावधी रुपये खर्च करून शासनाने सिंदखेडराजा तालुक्यातील कुबेंफळ ,कोणाटी, देऊळगाव कोळ, कंडारी, भंडारी, जागदरी, झोटिंगा ही गावे व लोणार तालुक्यातील खळेगाव, कारेगाव, महार चिकना, अंजनी खुर्द ,खापरखेड, सोमठाणा, पिंपरी खंदारे, ब्राह्मण चिकना, शिंदी अशा बऱ्याच गावात हजारो मीटर पर्यंत शासनाच्या जलजीवन मिशन अंतर्गत बर्याच योजनेअंतर्गत कोट्यवधी रुपये खर्च करून पाईप लाईन केल्यात परतुं धरणातील पाणी अजुन आठ दिवसांत शंभर टक्के आटणार आहे त्यामुळे लोणार तालुक्यातील नऊ गावे व सिंदखेडराजा तालुक्यातील सात गाव यांना पाणीटंचाई चा खुप मोठा सामना करावा लागणार आहे

महारचिकना गावाच्या पाणीपुरवठ्यासाठी खोदलेल्या कोनत्याच विहीरीवर एक ते दीड तासांच्या वर विद्युत पंप चालत नाही त्यामुळे गावाला आतापासूनच पाणीटंचाई चे चटके सहण करावे लागत आहे त्यामुळे शासनाने लवकरच विहीर अधिग्रहण किंवा टँकरची व्यवस्था करावी अशी मागणी गावातील महिला पुरुष करीत आहेत